MHBI160012842023

# दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१९०/२०२३ मधील निशाणी क्र. १ खालील आदेश.
# भगवान व ईतर वि. पांडुरंग व ईतर

प्रस्तूतचा अर्ज हा अर्जदार यांनी बॉम्बे रेग्यूलेशन अधिनियम १८२७ च्या तरतुदी अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणेकामी दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे अर्जातील कथनाप्रमाणे अर्जदार हे अर्जात नमुद पत्यावरील रहिवाशी आहेत. मयत क्र.१ मारुती संतु खेडकर हे मौजे घा. पारगाव, ता. शिरूर कासार येथील रहिवासी होते व ते दिनांक ०२/०३/२००२ रोजी मयत झाले. तसेच मयत क्र.२ वाल्हाबाई मारुती खेडकर ही मौजे घा. पारगाव, ता. शिरूर कासार येथील रहिवासी होती व ती दिनांक २१/१२/२००३ रोजी मयत झाली. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ व २ हे मयत मयत क्र.१ मारुती संतु खेडकर व मयत क्र.२ वाल्हाबाई मारुती खेडकर यांचे मुले असुन गैरअर्जदार क्र.३ ते ५ हे मयत क्र.१ व २ यांचा मयत मुलगा खंडु मारुती खेडकर याचे मुले असुन मयत क्र.१ व २ यांचे नातु व नात आहेत. तसेच गैरअर्जदार क्र. ६ ही मयत क्र.१ व २ यांचा मयत मुलगा त्रिंबक मारुती खेडकर याची पत्नी असुन मयत क्र.१ व २ यांची सुन आहे. तसेच गैरअर्जदार क्र.७ व ८ हे मयत क्र.१ व २ यांचा मयत मुलगा त्रिंबक मारुती खेडकर याचे मुले असुन मयत क्र.१ व २ यांचे नातु आहेत.

३. प्रस्तुतचा अर्ज प्रलंबित असताना गैरअर्जदार क्र.७ हा मरण पावला. करिता, अर्जदाराने निशाणी ३२ वर पुरसीस दाखल करुन गैरअर्जदार क्र.७ हा प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्यानंतर मयत झाल्याचे कळविले आहे. तसेच निशाणी ३५ च्या यादीलगत गैरअर्जदार क्र.७ महेश त्रिंबक खेडकर याचे मृत्युप्रमाणपत्राची प्रत दाखल केली आहे. यावरुन गैरअर्जदार क्र.७ महेश त्रिंबक खेडकर हा मयत झाला असल्याचे स्पष्ट होते. गैरअर्जदार क्र.७ चे वारस प्रस्तुत अर्जास हजर असल्याने गैरअर्जदार क्र.७ चे नाव प्रस्तुत प्रकरणातुन कमी करण्यात आले आहे.

४. अर्जदाराच्या मते, तो व गैरअर्जदार क्र.१ ते ६ व ८ या व्यतिरिक्त मयत क्र.१ मारुती संतु खेडकर व मयत क्र.२ वाल्हाबाई मारुती खेडकर यांना इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत. मयत क्र.१ मारुती संतु खेडकर व मयत क्र.२ वाल्हाबाई मारुती खेडकर यांचे मृत्यु पश्चात अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी वारस दाखल्याची गरज आहे. करीता अर्जदाराने तो व गैरअर्जदार क्र.१ ते ६ व ८ हे मयत क्र.१ मारुती संतु खेडकर व मयत क्र.२ वाल्हाबाई मारुती खेडकर यांचे एकमेव वारस असल्याबाबतचा वारस दाखला मिळणेसाठी प्रस्तूतचा अर्ज दाखल केला आहे.

५. अर्जदाराने त्याचे कथनांचे पुष्ठयर्थ निशाणी ०६ वर मयत मारुती संतु खेडकर व निशाणी ७ वर वाल्हाबाई मारुती खेडकर यांचे मृत्युप्रमाणपत्र दाखल केले आहे. तसेच निशाणी ०४ च्या यादीलगत अर्जदाराचे ओळखपत्र म्हणून त्याच्या पॅनकार्डची प्रत दाखल केली आहे. तसेच अर्जाच्या पृष्ठयार्थ अर्जदाराने निशाणी ३१ वर त्याचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यामध्ये अर्जदाराने अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केली असुन अर्जातील मागणीस अनुसरुन वारसा प्रमाणपत्र देण्याची विनंती केली आहे.

६. गैरअर्जदार क्र.१ ते ६ व ८ यांना नोटीसीची बजावणी होवूनही ते हजर न झाल्याने प्रस्तुतचा अर्ज त्यांचे विरूध्द एकतर्फा चालविण्याचा आदेश पारीत करण्यात आला.

७. अर्जातील कथनास अनुसरुन जाहीरनामा निशाणी ८ काढण्यात आला. त्याचप्रमाणे दिनांक २५/०७/२०२३ रोजी दैनिक संकेत या वर्तमानपत्रात जाहीर नोटीस निशाणी ३० प्रसिध्द करण्यात आली व त्यानुसार अर्जदाराचे मागणी प्रमाणे अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ ते ६ व ८ हे मयत क्र.१ मारुती संतु खेडकर व मयत क्र.२ वाल्हाबाई मारुती खेडकर यांचे वारस असलेबाबत दाखला देणेसंदर्भात हरकती मागविण्यात आल्या. परंतु, विहीत कालावधीत कोणीही न्यायालयात हजर राहून अर्जदाराचे मागणी प्रमाणे वारस दाखला देणेबाबत हरकत घेतलेली नाही.

८. अर्जदारा मार्फत अभिलेखावर आलेला तोंडी पुरावा व त्याबाबत वरील विवेचना वरून असे दिसून येते की, अर्जदाराने त्याचे पुराव्यात मयत क्र.१ मारुती संतु खेडकर व मयत क्र.२ वाल्हाबाई मारुती खेडकर यांना अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ ते ६ व ८ हे वारस असल्याचे शपथेवर कथन केले आहे. अर्जदाराचे सदरचे कथन कोणीही आव्हानलेले नाही. त्यामुळे अर्जदाराचा पुरावा आहे तसा स्वीकारणे क्रमप्राप्त होते. परिणामी, अर्जदाराच्या उपलब्ध पुराव्यावरून अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ ते ६ व ८ हे मयत क्र.१ मारुती संतु खेडकर व मयत क्र.२ वाल्हाबाई मारुती खेडकर यांचे कायदेशीर वारस असल्याचे सिध्द होते. करीता अर्जदार हा त्याचे मागणीप्रमाणे तो व गैरअर्जदार क्र.१ ते ६ व ८ मयत क्र.१ मारुती संतु खेडकर व मयत क्र.२ वाल्हाबाई मारुती खेडकर यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र मिळणेस पात्र आहे. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ ते ६ व ८ हे मयत क्र.१ मारुती संतु खेडकर व मयत क्र.२ वाल्हाबाई मारुती खेडकर यांचे वारस असलेबाबतचे वारस प्रमाणपत्र सिव्हील मॅन्युअलचे भाग १४ परिच्छेद क्र.३१२ नुसार योग्य त्या कोर्ट फी रकमेवरती जारी करण्यात यावे.

AKSHAY SAMBHAJI JAGTAP

Digitally signed by AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Date: 2026.04.01 13:37:23 +0530

स्थळः– शिरूर कासार.
दि.२७/०३/२०२६

**(अ.सं.जगताप)**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, शिरूर कासार.

“I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order”.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 27/03/2026 |
| Transcribed on | : | --------------- |
| Checked & signed on | : | 27/03/2026 |

SAGAR SOPANRAO AJABE

Digitally signed by SAGAR SOPANRAO AJABE
Date: 2026.04.01 13:37:50 +0530

**[Sagar S. Ajabe]**
Stenographer Grade-3